# १० शेतमाल निर्यातविषयक सर्वसाधारण माहिती

## शेतकरी / संस्था यांनी निर्यातदार होण्यासाठी व कृषिमालाच्या निर्यातीसाठी करावयाची कार्यवाही

### १) आयात निर्यात परवाना (आय.ई.सी) काढणे -

- n आयात निर्यात परवाना प्राप्त करुन घेण्यासाठी http://dgft.delhi.nic.in या बेवसाईटवर download option मध्ये ANF2A फॉर्म डाऊनलोड करणे.
- n सहसंचालक, विदेश व्यापार, पुणे, यांच्या कार्यालयाकडून पुणे, अहमदनगर, जालना, बीड, कोल्हापूर, लातूर, नांदेड, परभणी, रत्नागिरी, सांगली, सातारा, उस्मानाबाद, सोलापूर, सिंधुदूर्ग आणि नाशिक या जिल्ह्यांसाठी आयात-निर्यात परवाना दिला जातो.
- n या व्यतिरिक्त जिल्ह्यांसाठी आयात निर्यात परवाना देण्याचे काम मुंबई येथील कार्यालयातून केले जाते.
- n सदरचा भरलेला अर्ज दोन प्रतींमध्ये सहसंचालक, विदेश व्यापार यांचेकडे वर नमूद केलेल्या कार्यालयामध्ये पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा लागतो. (पत्ता पुस्तिकेच्या शेवटी दिलेला आहे.)

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी लागतात.**

- अर्जदाराचे आयात निर्यात परवान्यासाठी मागणीपत्र
- पॅन कार्डची (वैयक्तिक अथवा संस्थेच्या नावावरील ) पुढील व मागील बाजूची सत्य प्रत (फोटो कॉपी)
- बँकेचे प्रपत्र - बी मसुद्यामधे बँकेचे अधिकाऱ्यामार्फत छायाचित्र साक्षांकित प्रमाणपत्र
- “Jt. DGFT” Pune / Mumbai यांच्या नावाने रु. १,०००/- चा धनाकर्ष (डी. डी.)
- अर्जदाराचे २ फोटो (पार्ट ए व पार्ट बी साठी)
- रु. ३०/- चे टपाल तिकीट चिकटवलेले २ लिफाफे १) अर्जदाराचा पत्ता २) बँकेचा पत्ता
- सर्व कागदपत्रावर अर्जदाराची स्वाक्षरी
- शॉप ॲक्ट प्रमाणपत्र ( असल्यास) त्याची सत्य प्रत
- भारतीय रिजर्व बँकेच्या नियमांनुसार दिवाळखोरांच्या यादीमध्ये नसल्याबद्दल घोषणापत्र
- अनिवासी भारतीय नसल्याबद्दलचे घोषणापत्र

- n वरील सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन अर्ज सादर केल्यानंतर सह संचालक, विदेश व्यापार यांच्याकडून आयात निर्यात परवाना रजिस्टर स्पीड पोस्टाव्दारे दिलेल्या पत्त्यावर पाठविला जातो.

- सदरचे आयात निर्यात परवाना काढण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन पणन मंडळामार्फत नाममात्र शुल्क घेऊन दिले जाते.

### २) अपेडा नोंदणी

- n आयात निर्यात परवाना प्राप्त झाल्यानंतर त्या आधारे कृषिमाल निर्यातीमधील विविध अनुदानाच्या तसेच अर्थसहाय्य योजनांचा लाभ घेण्यासाठी अपेडा (ॲग्रीकल्चर अँड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्टस एक्सपोर्ट डेव्हलपमेंट ॲथोरिटी) यांचे रजिस्ट्रेशन करुन घ्यावे.
- n अपेडा नोंदणीसाठी खालील कागदपत्रांची आवश्यकता

- अर्जदाराचे अपेडा नोंदणीसाठी मागणीपत्र

- पॅन कार्डची पुढील व मागील बाजूची सत्य प्रत (फोटो कॉपी)
- बँकेचे अधिकाऱ्यांमार्फत विहीत नमुन्यामधे लिफाफाबंद प्रमाणपत्र
- "APEDA" Mumbai यांच्या नावाने रु. ५,०००/- चा धनाकर्ष
- अर्जदाराचा १ फोटो
- प्रक्रिया उत्पादक निर्यातदार असल्यास उत्पादनासाठी घेतलेल्या परवान्याची सत्य प्रत
- शेतकरी निर्यातदार असल्यास विहीत नमुन्यात तालुका कृषी अधिकाऱ्याचा दाखला.
- मेमोरँडम व आर्टीकल्स ऑफ असोसिएशन (असल्यास) ची सत्यप्रत
- मागील तीन वर्षाचा ताळेबंद
- अपेडाच्या कोणत्याही कार्यालयाकडे नोंदणी नसल्याबद्दल नोटरी साक्षांकित घोषणापत्र
- सर्व कागदपत्रावर अर्जदाराची स्वाक्षरी

n सभासदत्व मिळाल्यानंतर अर्जदाराने विहीत नमून्यामध्ये निर्यात केलेल्या मालासंबंधी यादी अपेडाला पाठविणे बंधनकारक

n निर्यातीच्या व्यवसायासाठी दूरध्वनी आंतरराष्ट्रीय सुविधासह व फॅक्स मशिन ही मुलभूत उपकरणे व ई-मेल सुविधा आवश्यक.

n अपेडा मुंबई कार्यालयाचा पत्ता पुस्तिकेत शेवटी दिलेला आहे.

- सदरचे अपेडा नोंदणी करण्यासाठी पणन मंडळामार्फत नाममात्र शुल्क घेऊन मार्गदर्शन केले जाते.

## ३) विक्रीकर कार्यालयात नोंदणी

n निर्यातदाराला निर्यात केलेल्या मालासंबंधीत केंद्रीय व राज्य विक्री करामध्ये सूट मिळते, म्हणून निर्यातदाराने विक्रीकर कार्यालयात नोंदणी करणे आवश्यक.

## ४) आयातदार निश्चित करणे

n कृषिमालाच्या निर्यातीसाठी परदेशातील आयातदाराबाबतची माहिती खालील माध्यमातून उपलब्ध होते.

- संबंधीत देशातील भारतीय दुतावास,
- अपेडा (www.apeda.com)
- इंडिया ट्रेड प्रमोशन ऑर्गनायझेशन,
- मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रिज अँड ॲग्रिकल्चर, पुणे
- महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे

n पत्रोत्तर प्राप्त झालेल्या इच्छूक आयातदारांसोबत पत्रव्यवहार अथवा दूरध्वनीव्दारे चर्चा करुन आवश्यक असलेल्या मालाचे नमुने पाठविण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

## ५) आयातदाराची पत तपासणी

n बहुतांशी ताजी फळे व भाजीपाल्याच्या निर्यातीमध्ये आयातदाराकडून कोणत्याही प्रकारची एल.सी. (लेटर ऑफ क्रेडिट) प्राप्त होत नाही. त्यामुळे फळे व भाजीपाल्याची निर्यात ही कन्साईनमेंट बेसीसवर (विकेल त्या दराने खरेदी या तत्वावर) केली जाते.

n त्यासाठी करावयाच्या उपाययोजना खालीलप्रमाणे.

- कोणत्याही प्रकारची मोठ्या प्रमाणावर निर्यात करण्याअगोदर ज्या आयातदारास निर्यात करावयाची आहे त्या आयातदाराची त्या मार्केटमधील पत तपासणे आवश्यक.

- आयातदाराची पत तपासणीचे काम डन अँड ब्रँड स्ट्रीट (www.dnb.com) यांसारख्या खाजगी संस्थांकडून अथवा एक्सपोर्ट क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन (www.ecgc.com) यासारख्या सरकारी संस्थांकडून करुन दिली जाते.

## ६) मालाच्या पॅकेजींग गुणवत्तेबाबत माहिती घेणे

- कृषिमालाच्या निर्यातीपूर्वी ज्या आयातदाराला व ज्या देशात कृषिमालाची निर्यात करावयाची आहे त्या देशामध्ये आवश्यक असलेली गुणवत्ता, पॅकींग, दर इ. बाबतची माहिती आयातदाराकडून प्राप्त करुन घ्यावी व त्या गुणवत्तेच्या मालाची निर्यात करण्यात यावी.
- सदरची निर्यात करत असताना आयातदाराचे मागणीनुसार ग्रेडींग व पॅकिंग करुन निर्यात करावी लागते.
- माल पाठविताना मालाची योग्य हाताळणी करुन माल परदेशात विक्रीसाठी आकर्षक टिकाऊ सुबक पॅकिंगमध्ये उपलब्ध होण्याच्या दृष्टिने खबरदारी घेणे आवश्यक.

## ७) दरांबाबत माहिती घेणे

- निर्यातीपूर्वी संबंधित बाजारपेठेमध्ये निर्यात करावयाच्या उत्पादनास प्राप्त होत असलेल्या विक्रीदराबाबतची माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक.
- निर्यात करण्यात येणाऱ्या मालाच्या विक्री रक्कमेमधून निर्यातीच्या खर्चाच्या रक्कमेची वजावट केल्यास संभाव्य फायद्याची व तोट्याची माहिती मिळू शकते.

## ८) सी.एच.ए. ची निवड करणे

- निर्यातीबाबतची सर्व कागदपत्रे तयार करणे, विमानामध्ये जागा आरक्षित करणे अथवा समुद्रमार्गे निर्यात करावयाची असल्यास कंटेनरचा पुरवठा करणे, कस्टम क्लिअरन्स करणे यासाठी क्लिअरींग अँड फॉरवर्डींग एजंटची आवश्यकता असते.
- अशा प्रकारच्या एजन्सी मुंबई तसेच पुण्यामध्ये उपलब्ध आहेत.

## ९) बँकेची निवड करणे.

- आयातदारांकडून निर्यात करण्यात आलेल्या मालाची विक्री रक्कम परकीय चलनामध्ये जमा करण्यात येते. सदर परकीय चलनाचे रुपयामध्ये रुपांतर होवून त्यानंतर सदरची रक्कम निर्यातदाराला प्राप्त होते.
- विक्रीची रक्कम लवकरात लवकर प्राप्त होण्याच्या दृष्टीने ज्या बँकेमध्ये परकीय चलनाच्या विनियोगाचे व्यवहार केले जातात अशा बँकेतच खाते उघडणे आवश्यक असते.

## १०) कागदपत्रांची पूर्तता करणे.

- इन्व्हाईस (स्वत: तयार करावा लागतो)
- पॅकिंग लिस्ट (स्वत: तयार करावी लागते)
- सर्टिफिकेट ऑफ ओरिजन (मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रिज अँड अॅग्रिकल्चर यांच्याकडून प्राप्त होते)
- फायटोसॅनिटरी सर्टिफिकेट (कृषि मंत्रालयाच्या प्लँट प्रोटेक्शन व क्वारंटाईन या विभागाकडून प्राप्त होते)
- इन्शुरन्स पॉलीसी सर्टिफिकेट (संबंधीत इन्शूरस कंपनीकडून प्राप्त होते)
- सर्टिफिकेट ऑफ इन्स्पेक्शन (कस्टम विभागाकडून प्राप्त होते)
- एअरवे बिल व बिल ऑफ लॅडींग (सी.एच.ए कडून प्राप्त होते)
- वरील सर्व कागदपत्रे प्राप्त करुन घेवून आयातदारास पाठवावी लागतात.
- निर्यात केल्यानंतर आयातदारासोबत चर्चा करुन निर्यात केलेल्या मालास मिळत असलेल्या विक्री दराबाबतची माहिती करुन घ्यावी लागते.

- वरील सर्व बाबी पूर्ण केल्यास अथवा वरील बाबींची संपूर्ण माहिती करुन घेऊन त्या प्रमाणे कार्यवाही केल्यास निर्यातीमध्ये अडचणी निर्माण होणार नाहीत.

## ११) निर्यात मालाचे पैसे मिळविणे.

- शेतकरी ज्यावेळेस आपला माल निर्यात करतो, त्यावेळी मालाचे पैसे मिळविणे अवघड व धोक्याचे काम असते.
- तथापि, आंतरराष्ट्रीय व्यापार पद्धतीत सारखेपणा व विश्वासार्हता आणण्याच्या दृष्टीने बरेच नियम तयार केले गेले आहेत आणि त्यामुळे निर्यातदारांना त्यांच्या मालाचे पैसे मिळण्यास बरीचशी सुलभता आणि शाश्वती आली आहे.
- शेतकरी/निर्यातदारांना निर्यात मालाचे मूल्य मिळण्याच्या पद्धती खालील प्रमाणे.

## अ) बँकेच्या पतपत्राव्दारे (लेटर ऑफ क्रेडिट)

- भारतीय निर्यातदाराने ठरलेल्या कराराप्रमाणे माल पाठविल्यास, करारात ठरलेल्या दराने मालाची किंमत मिळण्यासाठी (परदेशातील) आयातदारांवर हुंडी काढल्यास ते पैसे देण्याची हमी देणारे पत्र (परदेशातील) आयातदारांची बँक (भारतातील) निर्यातदारास देते यालाच लेटर ऑफ क्रेडिट म्हणतात.
- यामुळे निर्यातदारांवर करारात ठरलेला माल ठराविक दराने व पद्धतीने पाठविण्याचे बंधन येते. पाठविलेल्या मालाचे मूल्य मिळण्याची हमी मिळते.
- याच पद्धतीने आयातदारांची बँक निर्यातदारास लेटर ऑफ क्रेडिट देऊ शकते. यामुळे आयातदार व निर्यातदार यांच्या करारातील अटीप्रमाणे माल पाठविला जाऊ शकतो व मालाची किंमत वसूल होते.
- या व्यवहारात दोन्ही पक्षकारांच्या बँका सहभागी होत असल्यामुळे व्यवहार पूर्ण होतात. दोन्हीकडून बँका आयातदार व निर्यातदारांच्या व्यवहारात कराराच्या अटींचे पालन होण्यासाठी महत्त्वाची अशी मध्यस्थांची भूमिका बजावतात.
- या व्यवहारात पैशाची आयातदाराच्या बँकेने हमी दिल्यामुळे व्यवहारात फसवाफसवीला वाव राहत नाही व निर्यातदाराला त्याचे पैसे हमखास मिळतात. पतपत्राच्या व्यवहारात खालील व्यक्ती व बँका यांचा संबंध येतो.

  १) बँक खाते उघडणारा आयातदार

  २) ज्याच्या नावावर खाते उघडले जाते तो निर्यातदार

  ३) आयातदाराने खाते उघडलेली त्याच्या देशातील बँक

  ४) निर्यातदाराला पैसे देणारी त्याच्या देशातील बँक

- पतपत्राचे परिवर्तनीय व अपरिवर्तनीय असे दोन प्रकार आहेत.
- परिवर्तनीय परिपत्रकात पतपत्र देणाऱ्या बँकेच्या परवानगीशिवाय बदल करता येतो किंवा ते रद्द करता येते. पतपत्र देणारी बँक नंतर असे बदल मान्य करते व पैसे देते.
- अपरिवर्तनीय परिपत्रकात सदर बँकेच्या परवानगी शिवाय कोणतेही बदल करता येत नाही. निर्यादाराच्या बँकेला विश्वासात घेवून आयातदाराने खाते उघडल्यास त्या व्यवहारात अधिक विश्वासार्हता प्राप्त होते.

## आ) कागदपत्राच्या आधारे पैसे घेणे.

- या पद्धतीमध्ये माल बोटीने अगर विमानाने आयातदाराच्या बँकेच्या नावावर पाठविला जातो.
- मालाचे बिल, वाहतुकीचे बिल व इतर कागदपत्र निर्यातदार आपल्या बँकेमार्फत आयातदाराच्या बँकेकडे पाठवितो.
- सर्व कागदपत्रे प्राप्त झाल्याचे बँक आयातदाराला कळविते व पैसे भरण्यासाठी सांगते.

- आयातदारांनी पैसे भरल्यानंतर सर्व कागदपत्र व माल आयातदाराला दिला जातो. तोपर्यंत माल बँकेच्या ताब्यात राहतो.
- आयातदारांनी भरलेले पैसे निर्यातदाराला त्याच्या बँकेमार्फत दिले जातात.
- या पद्‌धतीमध्‌ये सर्व व्यवहार बँकांमार्फत होत असल्याने निर्यातदाराला मालाचे पैसे मिळण्याची खात्री असते. बँकेमार्फत पाठविलेली हुंडी सोडवून मालाचे पैसे भरुन आयातदार व्यापारी माल ताब्यात घेतो.

## इ) कन्साइनमेंट पध्दत.

- आयातदाराला विक्रीसाठी माल ताबडतोब उपलब्ध व्हावा म्हणून निर्यातदार ऑर्डर मिळाल्यानंतर प्रथम माल पाठवितो.
- निर्यातदाराची त्या देशात माल साठवणुकीची व्यवस्था असेल तर तेथे माल पाठवितो व तेथून आयातदाराला पुरवठा केला जातो किंवा निर्यातदाराचा स्वत:चा एजंट असल्यास त्याच्यामार्फत माल पुरविला जातो व नंतर चालू बाजार भावाप्रमाणे विक्री करुन निर्यातदाराला पैसे पाठविले जातात.
- कोणत्याही प्रकारचा करार न करता माल पाठविणे व नंतर चालू बाजारभावाप्रमाणे विक्री व्यवस्थापन खर्च वजावट करुन पैसे घेणे याला कन्साईनमेंट पद्‌दत म्हणतात.
- या पद्‌दतीत पैसे न मिळण्याचा धोका आहे. शिवाय बाजारभावाच्या चढउताराप्रमाणे भाव कमी मिळण्याची शक्यता असते.
- अशा प्रकारे निर्यातदाराला त्याच्या मालाचे पैसे निरनिराळ्या पद्‌दतीव्दारे मिळवता येतात.

युरोपियन देशांमध्‌ये भारतातून कृषिमाल निर्यात करावयाचा झाल्यास ग्लोबल गॅप प्रमाणिकरण करणे क्रमप्राप्त आहे.

## ग्लोबल गॅप प्रमाणिकरण -

- युरोपियन देश, अमेरिका व जपान या राष्ट्रांना राज्यातील फळांची निर्यात करण्यासाठी ग्लोबलगॅप प्रमाणपत्र असणे अत्यंत आवश्यक आहे.
- ग्लोबलगॅप प्रमाणिकरणासाठी युरोपातील काही व्यापारी असोसिएशन्स कार्यरत आहेत.
- असे व्यापारी असोसिएशन्स व अपेडा यांनी ग्लोबलगॅप प्रमाणपत्र देण्यासाठी भारतामध्‌ये एकूण ८ एजन्सीना मान्यता दिलेली आहे.
- असे प्रमाणपत्र मिळविण्यापूर्वी शेतकऱ्याला लागवड, मशागत, उत्पादन पद्‌दती, पूरक प्रशिक्षण, काढणी पश्चात हाताळणी यासाठी तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.
- ग्लोबलगॅप प्रमाणिकरणासाठी शेतकऱ्याला प्रत्येकी सुमारे रु. १५,०००/- पर्यंत खर्च येतो व शेतकऱ्यांच्या गटास प्रमाणिकरणासाठी प्रती शेतकरी रु. ३,०००/- ते रु. ५,०००/- इतका खर्च येतो.
- राज्यातील शेतकऱ्यांना ग्लोबलगॅप प्रमाणपत्रासाठी प्रशिक्षण हे पणन मंडळामार्फत देण्यात येते.
- फिक्की, नवी दल्ली या संस्थेने पणन मंडळातील अधिकाऱ्यांना ग्लोबलगॅप प्रमाणिकरणासाठी प्रशिक्षण दिले आहे.
- राज्यातील शेतकऱ्यांना ग्लोबलगॅपचे प्रमाणपत्र फूडसर्ट इंडिया, हैद्राबाद या संस्थेकडून पणन मंडळामार्फत मिळवून देण्यात येते.
- शेतकऱ्यांना ग्लोबलगॅप प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या ५०% रक्कम पणन मंडळ अनुदान म्हणून शेतकऱ्यांना देते.

HHH